वाचले: १. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन आदेश जा.क्र. बी/एडीएम/०३/८४२४/२०२६, दिनांक ०३/०९/२०२६.

२. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन आदेश जा.क्र. बी/एडीएम/०३/८४२६/२०२६, दिनांक ०३/०९/२०२६.

३. जिल्हा न्यायालय, सातारा कार्यालयीन पत्र जा.क्र. बी/एडीएम/०३/८४२७/२०२६, दिनांक ०३/०९/२०२६.

४. श्री. शुभम मुकूंद पारखी, लघुलेखक ग्रेड–३ पदाची निवड यादी क्र. ११, रा. मु.पो. विटा ता. खानापूर जि. सांगली यांचा दिनांक ०३/०९/२०२६ रोजीचा विनंती अर्ज.

५. श्रीमती पुनम मुरलीधर कुंभार, लघुलेखक ग्रेड–३ पदाची निवड यादी क्र. १३, रा. संगमाहूली ता.जि. सातारा यांचा दिनांक ०४/०९/२०२६ रोजीचा विनंती अर्ज.

–०–०–०–

उपरोक्त संदर्भ क्र. १ चे आदेशान्वये श्री. शुभम मुकूंद पारखी व श्रीमती पुनम मुरलीधर कुंभार, लघुलेखक ग्रेड–३ चे पदाच्या निवड यादीतील अ. क्र. ११ व १३ यांची अनुक्रमे दिवाणी न्यायालय क. स्तर, फलटण व खंडाळा येथे तदर्थ हंगामी स्वरुपात प्रथम नियुक्तीने लघुलेखक ग्रेड–३ चे पदावर नेमणूक करणेत आली आहे. त्यास अनुसरुन श्री. शुभम मुकूंद पारखी यांना संदर्भ क्र. २ आणि श्रीमती पुनम मुरलीधर कुंभार यांना संदर्भ क्र. ३ चे नियुक्ती पत्र निर्गमीत करणेत येऊन त्यांना नियुक्ती पत्र मिळालेचे दिनांकापासून सात दिवसाचे आंत नेमणूकीचे ठिकाणी हजर होणेस निर्देशीत केले होते. सदरील नियुक्तीपत्रास अनुसरुन श्री. शुभम पारखी यांनी संदर्भ क्र. ४ चे अर्जान्वये नियुक्ती स्वीकारणेस इच्छूक नसून त्यांचे नांव निवड यादीतून कमी करणेची विनंती केली आहे. तसेच श्रीमती पुनम कुंभार यांनी संदर्भ क्र. ५ चे अर्जान्वये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणार नसलेबाबत या कार्यालयास कळविले आहे. त्यास अनुसरुन निम्नस्वाक्षरीतकार खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

कार्यालयीन आदेश:–

लघुलेखक ग्रेड–३ चे पदाकरिता निवड केलेल्या उमेदवारांच्या निवड यादीतील अ.नं. ११ चे उमेदवार **श्री. शुभम मुकूंद पारखी** व अ.नं. १३ चे उमेदवार **श्रीमती पुनम मुरलीधर कुंभार** यांची अनुक्रमे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, फलटण व खंडाळा या न्यायालयाचे आस्थापनेवर दिनांक ०७/०९/२०२६ चे

कार्यालयीन वेळेपूर्वी पासून लघुलेखक ग्रेड–३ चे पदावर संदर्भ क्र. १ चे कार्यालयीन आदेशान्वये नेमणूक करणेत आली होती. ती नेमणूक उपरोक्त संदर्भ क्र. ४ व ५ चे विनंती अर्जास अनुसरुन याद्वारे रद्द करणेत येऊन त्यांचे लघुलेखक ग्रेड–३ चे पदाच्या निवड यादीतील अ.नं. ११ व १३ येथे असलेले नांव या आदेशान्वये कमी करणेत येत आहे.

श्री. शुभम मुकूंद पारखी व **श्रीमती पुनम मुरलीधर कुंभार** यांची नांवे लघुलेखक ग्रेड–३ चे पदाकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या निवड यादीतून कमी केले असल्याने त्यांची लघुलेखक ग्रेड–३ चे पदावरील केलेली नेमणूक रद्द करण्यात येत आहे. त्यामुळे अनुक्रमे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, फलटण व खंडाळा या आस्थापनेवरील लघुलेखक ग्रेड–३ चे प्रत्येकी एक पद रिक्त झाले आहे. सदरची पदे तुर्त रिक्त ठेवून, ती रिक्त पदे भरणेबाबतचा आदेश नंतर निर्गमित करणेत येईल याची नोंद घेणेत यावी.

सदरील आदेशाचा अंमल सत्वर लागू करणेत येत आहे.

08.09.26

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांकः– ०८/०९/२०२६.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
सातारा.

–०–०–०–

जा.क्र. बी/एडीएम/०३/८५६६/२०२६

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर :–

०१. मा. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खंडाळा.
०२. मा. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, फलटण.
०३ अधिक्षक, प्रशासन/न्यायिक, जिल्हा न्यायालय, सातारा.
०४. श्री. शुभम मुकूंद पारखी,रा. मु.पो. विटा ता. खानापूर जि. सांगली–ई–मेलद्वारे.
०५. श्रीमती पुनम मुरलीधर कुंभार, संगमाहूली ता.जि. सातारा–ई–मेलद्वारे.
०६. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, सातारा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरीता.

जिल्हा न्यायालय, सातारा.
दिनांक:– ०८/०९/२०२६.

आदेशावरून
प्रबंधक
जिल्हा न्यायालय,सातारा